कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक १७/०८/२०१७

दिनांक १६/०८/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. अपर पोलीस अधिक्षक सा़ो. यांच्या आदेशान्वये तसेच मा. पोलीस निरीक्षक स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली नामे- १) राकेश दादाजी राऊत, वय-३५ वर्ष, व्यवसाय- शेती तसेच २) दादाजी ढेकलु राऊत दोन्ही रा. कोरेगांव, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली यांचे घराची अवैध दारु संदर्भात घर झडती घेतली असता त्यांचे राहते घरातील बैठक खोलीत देशी दारुच्या ८२० सिलबंद निपा असा एकूण ४९,२००/- रु. चा माल अवैधरित्या बाळगुन ठेवला असल्याचे मिळून आले.

नमुद दोन्ही आरोपी विरुद्ध पोस्टे देसाईगंज येथे गुरनं ३६४/२०१७ कलम ६५ (ई), ८३ (अ), ८६ (१) अन्वये गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाच पुढील तपास पोस्टे देसाईगंज येथे चालू आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस अधिक्षक सा़ो. गडचिरोली यांचे आदेशान्वये तसेच पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा प्रमोद बाळके, पोना दुधराम चवारे, उध्दव नरोटे, मपोशि दुर्गा साखरे, चापोना प्रशांत पातकमवार यांचे पथकाने पार पाडली.

